दूरध्वनी : २८४१५७६/२०२६२४१ फॅक्स : २०२९३४८
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइंट, मुंबई-२१.

**क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/** 1515 **दिनांक : १७ मे, २००१**

**परिपत्रक क्र.७१**

**विषय** : तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजनांची तपासणी करणेबाबत.

**संदर्भ** : दि.२७/४/२००१ रोजी मा.मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक.

दि.२७/४/२००१ रोजी मा.मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई संदर्भात विविध निर्णय घेण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या शक्तीप्रदत्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा.मुख्य सचिव, यांनी खालीलप्रमाणे सूचना केलेली आहे.

**राज्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या सर्व तातडीच्या नळ पाणी पुरवठा योजनांची तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यामार्फत करण्यात यावी.** या महत्वाच्या सूचनेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देशित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यानी त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या व विविध यंत्रणांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व तातडीच्या नळ पाणी पुरवठा योजनांची तपासणी करावी व त्याबाबतचा अहवाल मुख्य अभियंत्यांमार्फत या कार्यालयास सादर करावा. तसेच तपासणीमध्ये आढळणाऱ्या त्रुटींबाबत संबंधित यंत्रणेस तांत्रिक मार्गदर्शनही करावे.

**(राजेंद्र सगणे)**
**सदस्य सचिव(तांत्रिक)**

प्रत : मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी सादर.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई, माहितीसाठी सादर.
सदस्य सचिव(प्रशासन), म.जी.प्रा., मुंबई, यांचे माहितीसाठी सस्नेह रवाना.
मुख्य अभियंता, म.जी.प्रा.विभाग(सर्व), यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई, यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे, यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
विभागीय आयुक्त,.................... महसूल विभाग, यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
आयुक्त, महानगरपालिका,...................., यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
जिल्हाधिकारी,................, यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,...................... यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ(सर्व) यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बांधकाम विभाग(सर्व)यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
मुख्याधिकारी, नगरपरिषद,.................... यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्या माहितीसाठी.

M. J. P.
ISSUED
19 MAY 2001
MUMBAI-21